**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ७० दिनांक १८/०९/२०२३**

# पालघर पोलीस दलाकडुन प्रथमच "गणराया पुरस्काराचे" आयोजन

दि.१९/०९/२०२३ ते दि.२८/०९/२०२३ रोजी पावेतो श्रीगणेशोत्सव सण साजरा होत आहे. पालघर जिल्ह्यात श्री गणेशोत्सव सण मोठ्या उत्साहाने साजरा होत असतो. त्याअनुषंगाने पालघर जिल्ह्यात एकूण ९१५० खाजगी गणेश मुर्तींची तसेच २०१६ सार्वजनिक गणेश मुर्तीची स्थापना होणार आहे. गणेशोत्सव सणाचे अनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस दलाचे वतीने श्री. बाळासाहेब पाटील पोलीस अधीक्षक पालघर तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. पंकज शिरसाट यांचे मार्गदर्शनाखाली गणेश उत्सव सण हा अधिक उत्साहवर्धक व विविध कलागुणांना वाव देणारा याच बरोबर शिस्तप्रिय सण म्हणुन साजरा करता यावा यासाठी यावर्षी पहिल्यांदाच **"गणराया पुरस्कार"**देण्याचे योजिले आहे.

पालघर जिल्हयातील प्रत्येक पोलीस ठाणे हद्दीत शहरी व ग्रामिण असे दोन भाग आहेत. त्यामुळे त्या-त्या पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना शहरी व ग्रामिण असे दोन्ही भागातील गणेश मंडळांना उत्कृष्ट गुणवत्ता पुरस्कार क्रमांक १, २, ३ व ४ था उत्तेजनार्थ असे पुरस्कारासाठी उत्कृष्ट मंडळाची निवड करुन पुरस्कार दयावयाचा आहे. उत्कृष्ट मंडळाची निवड करणेसाठी पोलीस ठाणे स्तरावर १) पत्रकार.२) सामाजिक कार्यकर्ता. ३) प्राध्यापक/शिक्षक.४) पोलीस पाटील.५) शांतता कमिटी सदस्य. ६) प्रतिष्ठीत व्यक्ती. अशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा स्तरीय **"गणराया पुरस्कारासाठी"** प्रत्येक पोलीस ठाणेमधील पहिल्या ०१ ते ०३ नंबरच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये सदरची स्पर्धा राहिल. ०४ था पुरस्कार हा उत्तेजनार्थ म्हणुन देण्यात येणार आहे. या सर्व १ ते ४ मंडळांना एक भव्य दिव्य कार्यक्रमात जिल्हा स्तरावर पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावर उत्कृष्ट मंडळाची निवड करणेसाठी १) अपर पोलीस अधीक्षक, पालघर २) गट विकास अधिकारी, ३) सामाजिक कार्यकर्ता. ४) प्राध्यापक/शिक्षक. ५) जिल्हा शांतता कमिटी सदस्य.६) प्रतिष्ठीत व्यक्ती. यांची समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

तरी आगामी साजऱ्या होणाऱ्या श्रीगणेशोत्सव सणासाठी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी पालघर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्व नागरीकांना शुभेच्छा दिल्या असून आगामी श्रीगणेशोत्सव शांततेत साजरा करण्याचे आवाहन केले आहे.